- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, २१ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२२ | किंमत : २ रूपये


**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-


**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६


# प्रश्नांच्या वेदनांवर फुंकर

# लाठीचार्ज





- संसद मार्गावर पुढे सरकणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी केला बळाचा वापर, अश्रूधुराच्या नळकांड्याही फोडल्या
- ४० ते ५० जणांची डोकी फोडण्यात आली, जखमींमध्ये मुलींचाही समावेश, आंदोलक पोलिसांमध्ये मोठा संघर्ष

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

शिक्षण क्षेत्रातील पेपर फुटीचे गैरप्रकार रोखणे आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या सुटकेच्या मागणीसाठी आज (२० जुलै) देशभरात निदर्शनांचा भडका उडाला. 'कॉकरोच जनता पार्टी' च्या आवाहनानंतर राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर हे या आंदोलनाचे मुख्य केंद्र बनले. दिल्लीसह महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये आणि लडाखमध्ये या आंदोलनाचे तीव्र पडसाद उमटले. दिल्ली पोलिसांनी आंदोलक विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केली. यामध्ये अनेकांची डोकी फोडली गेली. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. देशासह महाराष्ट्रात सुद्धा आंदोलनाचा भडका उडाला. मुंबई, पुण्यासह कोल्हापूर, यवतमाळ जिल्ह्यातही विद्यार्थी रस्त्यावर उतरले. दिल्ली पोलिसांनी सकाळीच मोर्चाला सुरू होण्यापूर्वी बळाचा वापर करताना अमानुष मारहाण केली होती. त्यानंतर आंदोलकांना करंट सुद्धा दिल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. अनेक आंदोलकांनी बॅरिकेड्सना हात लावल्यानंतर करंट बसल्याचा गंभीर आरोप केला. या संदर्भात काही पत्रकारांनी पोलिसांना विचारला असता पोलिसांनी त्यावरती कोणतही उत्तर न देता 'बाजूला व्हा, बाजूला व्हा' अशा पद्धतीने उत्तर दिली. त्यामुळे दिल्लीमध्ये दिल्ली पोलिसांची दमनशाही सुरू आहे का? असा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला आहे. लेह आणि कारगिलमध्ये हजारो नागरिकांनी रस्त्यावर उतरून धरणे आंदोलन केले. जम्मू आणि हिमाचल प्रदेशातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी तीव्र निदर्शने केली.

दिल्ली पोलिसांनी सोनम वांगचुक यांना बळजबरीने ताब्यात घेऊन सफदरजंग रुग्णालयात दाखल केल्यानंतर, शेकडो समर्थक व उखढ कार्यकर्ते रात्रभर जंतर-मंतरवरच ठाण मांडून होते. आज सकाळी सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली जे. आंगमो आणि सीजेपी संस्थापक अभिजित दीपके यांनी आंदोलनाची सूत्रे हाती घेतली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दिल्ली पोलिसांनी नवी दिल्ली जिल्ह्यात कलम १६३ (प्रतिबंधात्मक हुकूम) लागू केला आणि हे आंदोलन बेकायदेशीर असल्याचे सांगत परिसर मोकळा करण्याचे आदेश दिले.

**गीतांजली यांना केसाला धरून खेचले**

संसदेच्या १५० मीटर अंतरावर विद्यार्थी पोहोचले असून त्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांकडून अमानुष पद्धतीने बळाचा वापर केला जात आहे. इतकेच नव्हे तर तब्बल ४० ते ५० जणांची डोकी फोडण्यात आली असून अनेकांना रक्तबंबाळ करण्यात आलं आहे. अनेक तरुणांना, विद्यार्थ्यांना रस्त्यावरच पोलिसांकडून बेदम मारहाण करण्यात आली असून अनेकांना गंभीर पद्धतीने मारहाण केली आहे. अनेक तरुणींची सुद्धा डोकी फोडण्यात आली आहे.

दरम्यान, कॉकरोच जनता पार्टीने ट्वीट करत सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली यांना सुद्धा केसाला धरून खेचल्याचा अत्यंत गंभीर आरोप केला आहे. इतकेच नव्हे तर १२ वर्षांच्या मुलीसह ४० ते ५० जणांची डोकी फोडून फोडली, असा गंभीर आरोप कॉंग्रेस जनता पार्टीने ट्वीट करत केला आहे.

**संसदेपासून अवघ्या २०० मीटरवर संघर्ष**

जंतर-मंतर आणि मंदी हाऊस मेट्रो स्टेशनजवळ जमलेल्या शेकडो आंदोलकांनी संसदेवर धडक देण्यासाठी 'चलो संसद' मोर्चा सुरू केला. संसद मार्गावर पोलिसांनी उभारलेले मोठे लोखंडी बॅरिकेड्स आंदोलकांनी खेचून पाडले आणि पुढे जाण्याचा प्रयत्न केला. सुरक्षारक्षक आणि पोलिसांनी रायसीना रोड आणि संसद मार्ग पोलीस ठाण्याजवळ आंदोलकांना अडवले. संसदेच्या इमारतीपासून अवघ्या २०० मीटर अंतरावर आंदोलक आणि पोलिसांमध्ये मोठा संघर्ष झाला. आंदोलन नियंत्रणात आणण्यासाठी दिल्ली पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर बळाचा वापर केला. मंडी हाऊस आणि संसद मार्गावर पुढे सरकणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. तसेच रायसीना रोडवर बॅरिकेड्स तोडणाऱ्या आंदोलकांवर अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. यात अनेक विद्यार्थी जखमी झाले. सुरक्षेचा उपाय म्हणून राजीव चौक आणि सेंट्रल सेक्रेटरीएट सह ५ महत्त्वाच्या मेट्रो स्टेशनचे दरवाजे बंद करण्यात आले.

**धक्काबुक्कीचे आरोप**

पोलिसांच्या कारवाईदरम्यान सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली आंगमो यांच्यासह इतर आंदोलकांना धक्काबुक्की करण्यात आल्याचा आरोप उखढ ने केला आहे. दरम्यान, आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि पोलिसांच्या कारवाईचा निषेध करण्यासाठी विरोधी पक्षांचे अनेक खासदार आणि प्रमुख नागरिक घटनास्थळी पोहोचले.

# वर्धा : समृद्धी मार्गावर अपघातात ५ ठार

## मुलीच्या इंजिनिअरिंगच्या प्रवेशासाठी परिवार पुण्याला गेले, मुलगी तिथेच राहिली, परतताना ट्रकने कारला धडक दिली, तिघे होरपळले, मृतांमध्ये दोन्ही गाड्यांच्या चालकांचा समावेश

**दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा**

समृद्धी महामार्गावर वर्ध्याजवळील विरुळ भागात एक अत्यंत भीषण आणि दुर्दैवी अपघात घडला आहे. आयशर ट्रक आणि स्विफ्ट डिझायर कार यांच्यात झालेल्या जोरदार धडकेनंतर कारने पेट घेतला. या दुर्घटनेत कारमधील चालकासह एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच होरपळून मृत्यू झाला, तर धडक देणाऱ्या आयशर ट्रकच्या चालकाचाही यात मृत्यू झाला आहे. या अपघातात एकूण ५ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत पावलेले कारमधील चौघेही वर्धा जिल्ह्यातील सालोड हिरापूर येथील रहिवासी होते. कुटुंबातील जुळ्या मुलींपैकी एका मुलीच्या इंजिनिअरिंग प्रवेशासाठी हे कुटुंब पुण्याला गेले होते. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेश घेतलेली मुलगी पुण्यातच थांबली, तर आई-वडील, दुसरी मुलगी आणि चालक कारने वर्ध्याकडे परत येत होते. मात्र, वाटेतच काळाने त्यांच्यावर घाला घातला. जुळ्या बहिणींपैकी एका बहिणीचा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे सालोड गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

अपघाताच्या काही वेळापूर्वी घटनास्थळाजवळ एथेनॉलचा एक टँकर उलटला होता. सुरक्षेचा उपाय म्हणून पोलिसांनी महामार्गाची एक बाजू बंद करून एकेरी वाहतूक सुरू केली होती. एकेरी वाहतूक सुरू असताना मागून येणाऱ्या भरधाव मालवाहू आयशर ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि तो थेट पुढे असलेल्या कारवर जाऊन आदळला. धडक इतकी भीषण होती की अपघातानंतर कारने क्षणात पेट घेतला. कारमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची साधी संधीही मिळाली नाही आणि आतच होरपळून चौघांचा करुण अंत झाला. घटनेची माहिती मिळताच



पुलगाव पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य राबवले. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

वर्धा पोलिस अधीक्षक, सौरभकुमार अग्रवाल, यांनी माहिती देताना सांगितलं की, "काल रात्री पुलगाव पोलीस स्टेशन हद्दीमध्ये समृद्धी महामार्गावर एक एथेनॉलचा टँकर पलटी झाला होता. तो नागपूरवरून नागपूरवरून येत होता. त्यामुळे त्या बाजूची जी रहदारी व्यवस्था आहे ती विस्कळीत झाली होती.




संपादकीय लेखणीतून...

## रोजगार हमी योजनेचा जन्म

वि.स.पागेंची रोजगार हमी योजना ही एकमात्र कल्पना होती असे नाही, तर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राबविलेला वीस कलमी कार्यक्रम ही कल्पना पागेंचीच होती. इंदिराजींनी त्यांना दिल्लीला बोलावून घेतले. त्यांनी एकांतात पागे यांच्याकडून या नामी कल्पना ऐकून समजून घेतल्या. त्यानंतर ही वीस कलमी कार्यक्रमांची कल्पना पंतप्रधानांचीच असल्याचे सांगण्यास बाध्य केले. इतरत्र याची वाच्यता न करण्याचेही पागेंना सांगण्यात आले, असे आपल्या वाचनात आले आहे.

स्वातंत्र्यसैनिक, रोजगार हमी योजनेचे जनक, महाराष्ट्राच्या विधानपरिषदेचे माजी सभापती, साहित्यिक, कवी व नाटककार

वि. स. पागे यांची आज जयंती. त्यांचे पूर्ण नाव विठ्ठल सखाराम पागे. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील बागणी येथे दि.२१ जुलै १९१० रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण तासगाव येथे झाले. ते सातव्या इयत्तेत पहिले आले होते. त्यानंतर ते संस्कृत विषय घेऊन बीए झाले. त्यानंतर त्यांनी एलएलबी ही कायद्याची पदवी घेतली. लहानपणापासूनच त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. वाळवा हा तालुका क्रांतिकारकांचा तालुका म्हणून ओळखला जातो. सन १९३०ची कायदेभंगाची चळवळ तसेच सन १९४२चे भारत छोडो आंदोलन यांमध्ये त्यांनी भाग घेतला होता. त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. स्वातंत्र्यानंतर वर्ष १९५२ ते १९६० या कालावधीत ते विधान परिषदेचे सदस्य झाले. त्यानंतर वर्ष १९६० ते १९७८ सुमारे अठरा वर्षे एवढ्या प्रदीर्घ कालावधीसाठी विधान परिषदेचे अध्यक्ष होते.

अत्यंत संयमी, शांत असे त्यांचे व्याक्तमत्त्व होते.

रोजगार हमी योजनेच्या कल्पनेबद्दल एक गोष्ट सांगितली जाते. महाराष्ट्रात साधारण १९७१ ते १९७४ या कालावधीमध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळी शेतकरी व कामकरी यांची परिस्थिती गंभीर झाली होती. दुष्काळाच्या या परिस्थितीचा विचार करीत ते एकदा आपल्या घरी झोपाळ्यावर बसले होते. त्यांनी त्यांच्या पत्नीला विचारले, प्रभा, घरात पैसे किती आहेत?" प्रभाताईंनी सांगितले, की सातशे रुपये आहेत. त्यावर त्यांनी विचारणा केली, की सातशे रुपयांत शेतावर किती गडी राबू शकतील? घरातून सांगण्यात आले, की वीस दिवस चौदा-पंधरा गडी सहज लावता येतील. मग काय त्यांनी थेट मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनाच पत्र लिहायला घेतले. त्यातील मजकूर असा होता. माननीय मुख्यमंत्री साहेब, माज्या शेतावर सातशे रुपयांत चौदा-पंधरा दिवस वीस गडी मजुरीला लावता आले. शंभर कोटी रुपये बाजूला काढलेत, तर किती मजुरांना काम देता येईल?" रोजगार हमी योजनेचा जन्म या चार ओळींमध्ये झाला. वसंतराव नाईक यांनी लगेचच पागे यांना बोलावून घेतले. नेमकं काय करायला हवं ते सगळं विचारून घेतलं. योजना फारच छान होती. पण शंभर कोटी रुपये कुठून आणायचे? या प्रश्नाने मुख्यमंत्री चिंतेत पडले. त्यावेळी शंभर कोटी रुपये खूप मोठी रक?कम होती. त्यांनी या विषयावर विरोधी पक्षनेत्यांसह खास बैठक बोलावली. या बैठकीत त्यावेळचे विधानसभेतले विरोधी पक्षनेते कृष्णराव धुळप उपस्थित होते. ते म्हणाले, की नाईकसाहेब, गरिबांना काम देत असाल तर या योजनेसाठी शंभर कोटी रुपये उभे करण्यास विधानसभेत आम्ही कर प्रस्ताव घेऊन येतो. जगाच्या संसदीय लोकशाही इतिहासात पहिल्यांदाच सत्ताधारी पक्षाला संपूर्णपणे मदत करण्यासाठी कर प्रस्ताव आणण्याची भूमिका सर्वप्रथम महाराष्ट्रातच घेतली गेली.

वि.स.पागेंची रोजगार हमी योजना ही एकमात्र कल्पना होती असे नाही, तर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राबविलेला वीस कलमी कार्यक्रम ही कल्पना पागेंचीच होती. इंदिराजींनी त्यांना दिल्लीला बोलावून घेतले. त्यांनी एकांतात पागे यांच्याकडून या नामी कल्पना ऐकून समजून घेतल्या. त्यानंतर ही वीस कलमी कार्यक्रमांची कल्पना पंतप्रधानांचीच असल्याचे सांगण्यास बाध्य केले. इतरत्र याची वाच्यता न करण्याचेही पागेंना सांगण्यात आले, असे आपल्या वाचनात आले आहे. पागे हे कवी, नाटककार होते. त्यांचे पहाटेची नौबत आणि अमरपक्षी या नावाचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी वीर मोहन नावाचे नाटक लिहिले होते. तसेच निवडणुकीचा नारळ नावाची नाटिका लिहिली होती. तुका म्हणे जाऊ वैकुंठा चालत हे संगीत नाटक त्यांनी लिहिले. पागे व नाईक दोघेही ग्रामीण भागातील असल्याने त्यांना शेतकरी व कामकरी यांच्या प्रश्नांची चांगली जाण असल्यामुळे रोजगारनिर्मिती व त्यातून विकास साधण्याची खरी प्रक्रिया सुरू झाली. रस्ते, पाझर तलाव, नाला बंडिंग, विहिरी अशा प्रकारची कामे सुरू झाली. अशातच दि.१६ मार्च १९९० रोजी विठ्ठल स. पागे यांचे निधन झाले.

# आंदोलकांचा आवाज: सरकारने दखल घेण्याची वेळ!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

दिल्लीत सोनम वांगचुक यांच्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांचे २० दिवसांहून अधिक काळ चाललेले उपोषण आणि नागरिकांचे जंतरमंतरवरील आंदोलन लोकशाहीत संवादाची व सरकारच्या हस्तक्षेपाची निकड अधोरेखित करतात.मात्र सरकारने सोनम वांगचूक यांच्या उपोषणाची व आंदोलनाची फारसी दखल घेतली नाही.

लोकशाहीत आंदोलकांचा आवाज दाबून टाकण्यापेक्षा त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा घडवून आणणे हेच सुशासनाचे लक्षण मानले जाते. सध्याच्या परिस्थितीत सरकार आणि आंदोलक यांच्यात संवाद होणे गरजेचे आहे.आंदोलकांना बळजबरीने हटवणे किंवा अटकेची कारवाई करणे यापेक्षा लोकशाही मार्गाने त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची लोक प्रतिनिधींची घटनात्मक जबाबदारी आहे.

लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला आपले मत संविधानिक पद्धतीने मांडण्याचा अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला आपले मत मुद्रित स्वरूपात किंवा अहिंसात्मक आंदोलनाच्या माध्यमातून मांडण्याचा अधिकार आहे. सरकारने मांडलेल्या मताकडे किंवा आंदोलनाकडे दुर्लक्ष करू नये. नागरिकांच्या मागण्या आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी सरकारने आंदोलकांची दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे. संवादातूनच अनेक समस्यांवर मार्ग निघू शकतो. आंदोलकांकडे दुर्लक्ष केल्यास असंतोष वाढतो आणि प्रशासनावरील विश्वास कमी होतो.

लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना शांततापूर्ण मार्गाने निदर्शने करण्याचा आणि आपल्या मागण्या मांडण्याचा मूलभूत अधिकार भारतीय संविधानाच्या कलम १९(१)(अ) आणि कलम १९(१)(ब) अंतर्गत प्रदान करण्यात आला आहे. संविधानाच्या या तरतुदींनुसार, नागरिकांना भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य तसेच शांततापूर्वक आणि निःशस्त्र एकत्र येण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधान दिलेले आहे.

लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला आपल्या मागण्या शांततापूर्ण मार्गाने मांडण्याचा अधिकार आहे. सरकारने आंदोलकांशी तत्काळ चर्चा करून त्यांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करायला हवा. नागरिकांच्या मागण्यांवर चर्चा करणे आणि त्यावर लोकशाही मार्गाने तोडगा काढणे ही सरकारची प्रशासकीय जबाबदारी मानली जाते. अशा आंदोलनांच्या वेळी कायदा व सुव्यवस्था राखणे आणि जनजीवन विस्कळीत होणार नाही याची खबरदारी घेणे हे देखील प्रशासनाचे काम असते. आंदोलक आणि शासन यांच्यातील रचनात्मक संवादामुळे अनेकदा सामोपचाराने मार्ग निघू शकतात. जर आंदोलनाकडे दुर्लक्ष केले तर परिस्थिती चिघळू शकते.योग्य वेळी दखल न घेतल्यास जनजीवन विस्कळीत व्हायला फारसा वेळ लागत नसतो. आंदोलनाकडे दुर्लक्ष केल्यास असंतोष वाढून मोठी सामाजिक अशांतता किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. वेळीच संवाद साधून व मागण्यांची दखल घेऊन जनजीवन विस्कळीत होण्यापासून वाचवणे हे प्रशासनाचे मुख्य कर्तव्य असते.

पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि इतर कार्यकर्त्यांनी निःपक्षपाती



परीक्षा पद्धती आणि NEET/UGC-NET पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कारवाईसाठी जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे बेमुदत उपोषण केले होते.मात्र सरकारने त्यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले. वांगचुक यांच्या प्रकृतीचे कारण पुढे करत सरकारने त्यांना जंतरमंतर वरून उचलले व इस्पितळात दाखल केले विरोधकांनी सरकारवर आंदोलन दडपण्याचा, आंदोलनं चिरडून टाकल्याचा आरोप केला आहे.आता सर्व विरोधी पक्ष एकत्र आल्याने परिस्थिती बिघडू देखील शकते.

संवादातून तोडगा निघू शकतो.आंदोलकांवर बळाचा वापर करण्यापेक्षा त्यांच्याशी चर्चा करणे आवश्यक असते. मागण्यांचा अभ्यास करून सकारात्मक निर्णय घेणे सरकारचे कर्तव्य असते. वांगचुक यांच्या उपोषणाला २० दिवसांपेक्षा जास्त काळ झाला तरी सरकारने त्यांच्याशी कोणताही थेट संवाद साधला नाही. यामुळे सरकार "क्रूर" आणि "असंवेदनशील" असल्याचा आरोप आंदोलक करत आहेत. इथे सरकारचे सफसेल चुकले,सरकारने दुर्लक्ष केले सरकारने जनतेच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. धोरणात्मक निर्णयांवर नागरिकांचा आक्षेप असल्यास त्याचे निवारण करण्याची जबाबदारी सरकारवर असते. लोकशाही व्यवस्थेत सरकारला आंदोलकांची दखल घ्यावीच लागते. जनआंदोलने ही लोकशाहीचा महत्त्वाचा भाग आहेत आणि कोणत्याही समस्येवर तोडगा काढण्यासाठी संवाद हाच योग्य मार्ग असतो.

इंदिरा गांधी यांनी सोनम वांगचुक यांचे वडील सोनम वांग्याल यांच्या आंदोलनाची केवळ दखलच घेतली नाही, तर स्वतः आंदोलनस्थळी जाऊन त्यांचे उपोषण सोडवले होते.

लडाखच्या लोकांना 'अनुसूचित जमातीचा' दर्जा मिळावा आणि लडाखची सांस्कृतिक व आर्थिक ओळख जपण्यासाठी घटनात्मक संरक्षण लाभावे, या मागण्यांसाठी सोनम वांग्याल यांनी १९८४ मध्ये लेह येथे आमरण उपोषण सुरू केले होते. लडाखमधील हे आंदोलन चिघळल्यामुळे देशाच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी स्वतः लेहला गेल्या आणि त्यांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला. इंदिरा गांधी यांनी लडाखच्या मागण्या गांभीर्याने तपासण्याचे आश्वासन दिले आणि स्वतः सोनम वांग्याल यांना ज्यूस पाजून त्यांचे उपोषण सोडवले होते.

इंदिरा गांधी यांच्या आश्वासनानंतर सुरू झालेल्या प्रक्रियेचा भाग म्हणून, १९८९ मध्ये केंद्र सरकारने अखेर लडाखच्या नागरिकांना अनुसूचित जमातीचा दर्जा दिला. आंदोलने ही नागरिकांच्या असंतोषाचे किंवा मागण्यांचे प्रकटीकरण असतात. राज्यकर्त्यांनी दडपशाही न करता आंदोलकांच्या मागण्यांची दखल घेऊन संवाद साधणे, हा लोककल्याणकारी राज्याचा पाया मानला जातो. राज्यघटनेच्या चौकटीत राहून प्रत्येक घटकाला, विशेषतः वंचित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देणे हे राज्याचे मुख्य कर्तव्य असते.

- ९५६१५९४३०६

# ब्रिटन दौऱ्यात टिम इंडियाची मालिका पराभवाची हॅट्रीक

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

रोहित शर्माच्या शानदार शतकानंतरही, इंग्लंडने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताला २७ धावांनी पराभूत केले. याप्रकारे इंग्लंडने तीन सामन्यांची मालिका २-१ ने जिंकली. यापूर्वी इंग्लंडने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत भारताला ४-० ने पराभूत केले होते आणि आता एकदिवसीय मालिकेतही आपले वर्चस्व सिद्ध केले. इंग्लंडने २०१९ नंतर प्रथमच भारताविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकली.

रविवारी ऐतिहासिक लॉर्ड्सच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यात, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर इंग्लंडने ५० षटकांत तीन गडी गमावून ३८७ धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारतीय संघ निर्धारित षटकांत सात गडी गमावून केवळ ३६० धावाच करू शकला. भारतासाठी रोहित शर्माने शानदार शतक झळकावले, तर शुभमन गिल आणि विराट कोहलीने अर्धशतके झळकावली. लक्ष्य इतके मोठे होते की, तीन फलंदाजांच्या शानदार खेळीनंतरही भारतीय संघ सामना जिंकू शकला नाही.

### रोहित-गिलची उत्कृष्ट भागीदारी

लक्ष्याचा पाठलाग करताना, रोहित आणि कर्णधार शुभमन गिल यांनी भारतासाठी डावाची सुरुवात केली. या दोन फलंदाजांनी पहिल्या विकेटसाठी १४७ धावांची भागीदारी करून संघाला मजबूत सुरुवात करून दिली. लॉर्ड्सवरील एकदिवसीय सामन्यांमधील ही भारताची दुसरी सर्वात मोठी भागीदारी आहे. मात्र, गिल ७७ धावा करून आपली विकेट गमावून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर रोहितने विराट कोहलीसोबत डाव सावरला. रोहितने वेगवान गतीने खेळत अवघ्या ८४ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले. लॉर्ड्सवर एकदिवसीय शतक झळकावणारा रोहित सर्वात वयस्कर खेळाडू ठरला. त्याने वयाच्या ३९ वर्षे आणि ८० दिवसांनी ही कामगिरी केली. इतकेच नाही, तर सर्व फॉरमॅटमध्ये भारतासाठी शतक झळकावणारा रोहित हा सर्वात वयस्कर फलंदाज आहे. मात्र, जेकब बेथेलने रोहितला बाद केले, जो ११० चेंडूंमध्ये १७ चौकार आणि पाच षटकारांसह १३८ धावांवर बाद झाला.

### कोहली बाद होताच सामना हातातून निसटला

गिल आणि रोहितने भारताला चांगली सुरुवात करून दिली आणि पहिली विकेट पडल्यानंतर, कोहलीने रोहितसोबत किल्ला लढवला. रोहित आणि कोहलीने दुसऱ्या विकेटसाठी ११३ धावांची भागीदारी केली, जी बेथेलने तोडली. मात्र, कोहलीने खेळपट्टीवर टिकून आपले अर्धशतक पूर्ण केले. लॉर्ड्सवरील कोहलीचे हे पहिले अर्धशतक होते.

ईशान किशन १४ धावांवर बाद झाला आणि त्यानंतर श्रेयस अय्यर शून्यावर बाद झाला, त्यामुळे भारताला तिसरा धक्का बसला. कोहलीच्या चिकाटीने भारताच्या आशा जिवंत ठेवल्या होत्या. मात्र, सॅम करनने विराट कोहलीला बाद करून भारताला पाचवी विकेट मिळवून दिली. कोहली ६० चेंडूंमध्ये चार चौकार आणि तीन षटकारांसह ७४ धावा करून बाद झाला. त्यानंतर केएल राहुल आणि अक्षर पटेलही स्वस्तात बाद झाल्याने भारताने सामना गमावला. करनने इंग्लंडसाठी चार बळी घेतले, तर आदिल रशीद, जोफ्रा आर्चर आणि जेकब बेथेल यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

### लॉर्ड्सवर इंग्लंडची सर्वोच्च धावसंख्या

यापूर्वी, इंग्लंडने लॉर्ड्सवर आपली सर्वोच्च एकदिवसीय धावसंख्या उभारली होती. बेन डकेटने इंग्लंडसाठी शतक झळकावले, तर जेकब बेथेल आणि जो रूट यांनी अर्धशतकी खेळी केली. जोस बटलरने चार चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने १३ चेंडूंमध्ये नाबाद ४१ धावा केल्या. अखेरीस बटलरच्याच खेळीने फरक घडवला. भारत लक्ष्याच्या जवळ पोहोचला होता, पण बटलरच्या मदतीने इंग्लंडने एक मोठी धावसंख्या उभारली, जिचा पाठलाग भारत करू शकला नाही. डकेटने १३५ चेंडूंमध्ये १८ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने इंग्लंडसाठी सर्वाधिक १४१ धावा केल्या. बेथेलने ९१ आणि रूटने नऊ चौकारांच्या मदतीने ४८ चेंडूंमध्ये नाबाद ७४ धावा केल्या. भारताकडून प्रसिद्ध कृष्णाने दोन बळी आणि प्रिन्स यादवने एक बळी घेतला.

### आपल्या बॅटने टीकाकारांना दिलेला संदेश

गेल्या काही दिवसांपासून, भारतीय संघाचा माजी कर्णधार रोहित शर्माच्या फलंदाजीपेक्षा त्याच्या भविष्याबद्दलच जास्त चर्चा होत आहे.

सातत्याने कमी धावा आणि लॉर्ड्सवरील हा त्याचा शेवटचा एकदिवसीय सामना असू शकतो, अशा मीडिया रिपोर्ट्समुळे या ३९ वर्षीय अनुभवी खेळाडूच्या कारकिर्दीबद्दल पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. पण क्रिकेटची मक्का असलेल्या लॉर्ड्सवर, रोहितने आपल्या शब्दांनी नव्हे, तर आपल्या बॅटने उत्तर दिले. त्याने एक झुंजार खेळी खेळली, ज्यामुळे एकतर्फी वाटणाऱ्या सामन्यात भारताला एका सन्मानजनक स्थितीत पोहोचता आले आणि तो देशातील सर्वोत्तम एकदिवसीय फलंदाजांपैकी एक का आहे, याची त्याने जगाला आठवण करून दिली.

### रोहितने आपल्या शतकाने कोणते विक्रम मोडले?

लंडनच्या ऐतिहासिक लॉर्ड्सवर एकदिवसीय सामन्यात शतक झळकावणारा रोहित हा पहिला भारतीय फलंदाज आहे.

त्याच्या आधी, लॉर्ड्सवर ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये कोणत्याही भारतीय फलंदाजाने शतक झळकावले नव्हते. लॉर्ड्सवर एकदिवसीय शतक झळकावणारा रोहित हा सर्वात वयस्कर खेळाडू आहे. त्याने वयाच्या ३९ वर्षे आणि ८० दिवसांनी ही कामगिरी केली. इतकेच नाही, तर सर्व फॉरमॅटमध्ये मिळून भारतासाठी शतक झळकावणारा रोहित हा सर्वात वयस्कर फलंदाज आहे. लॉर्ड्सवर एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारा भारतीय खेळाडू रोहित ठरला. त्याने माजी कर्णधार सौरव गांगुलीचा विक्रम मोडला. या सामन्यात रोहितने १३८ धावा केल्या, जी लॉर्ड्सवर कोणत्याही भारतीय फलंदाजाने केलेली सर्वोच्च धावसंख्या आहे. गांगुलीने २००४ मध्ये लॉर्ड्सवर ९० धावा केल्या होत्या, पण आता रोहितने हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. रोहितने इंग्लंडमध्ये आपले आठवे शतक झळकावले आणि एकाच परदेशी देशात सर्वाधिक शतके करणारा भारतीय खेळाडू बनला.

- ९०९६३७२०८२

# ऐतिहासिक मोहिमेचा उत्सव: चंद्र दिवस

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली



अपोलो ११ चंद्र मोहिमेचा भाग म्हणून चंद्रावर मानवाच्या पहिल्या लँडिंगचा वर्धापन दिनानिमित्त आंतरराष्ट्रीय चंद्र दिवस साजरा केला जातो. या उत्सवांमध्ये चंद्राच्या शोधातील सर्व राज्यांच्या यशाचाही विचार केला जातो आणि चंद्राच्या शाश्वत शोध आणि उपयोगाबद्दल जनजागृती केली जाते.

हजारो वर्षांपासून मानवी संस्कृतींनी आकाशाकडे पाहिले आहे. चंद्राच्या उत्पत्ती आणि रहस्यांचा विचार केला आहे- आपला एकमेव नैसर्गिक उपग्रह. पहिल्या दुर्बिणीच्या आविष्कारामुळे सक्षम झालेल्या ग्राउंड-आधारित निरीक्षणांनी आपल्या खगोलीय सहचराबद्दलच्या आपण समजून घेण्याचा एक नवीन अध्याय उघडला. अंतराळ क्रियाकलापांच्या जन्मासह, चंद्र असंख्य मोहिमांचे अंतिम गंतव्यस्थान बनले, ज्यामध्ये क्रूड फ्लाइटचा समावेश आहे ज्याने विश्वातील पहिल्या मानवी पावलांचे ठसे दुसऱ्या ठिकाणी आणले. महत्त्वाकांक्षी योजनांसह चंद्र संशोधनाचे प्रयत्न सुरूच राहिल्याने, हा जागतिक उत्सव केवळ भूतकाळातील यशाची आठवण म्हणून नव्हे तर भविष्यातील प्रयत्नांची वार्षिक साक्ष म्हणून काम करेल.

मानवाने १९६९मध्ये चंद्रावर पहिले पाऊल टाकले, तो दिवस म्हणून चंद्र दिवस साजरा केला जातो. दि.२० जुलै १९६९ या दिवशी अमेरिकेचे सुप्रसिद्ध अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग यांच्या रूपाने मानवाने चंद्रावर पहिले पाऊल ठेवले होते. अपोलो ११ नावाच्या यानातून आर्मस्ट्राँग चंद्रावर उतरले, तेव्हा ते ३८ वर्षांचे होते.

हा तो दिवस होता जेव्हा दि.२० जुलै १९६९ रोजी रात्री २०.१७ वाजता अपोलो ११पृथ्वीच्या एकमेव उपग्रहावर उतरला. लँडिंगच्या सहा तासांनंतर अंतराळवीर नील आर्मस्ट्राँगने चंद्राच्या पृष्ठभागावर पाऊल ठेवले. आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा चंद्राच्या पृष्ठभागावर पाऊल ठेवले तेव्हा तो क्षण थेट प्रक्षेपित करण्यात आला. बझ अल्ड्रिन आणि मायकेल कॉलिन्स या सहकाऱ्यांसोबत चार लाख किलोमीटरचा प्रवास तीन दिवसांत नील आर्मस्ट्राँग यांनी केला. यानाच्या बाहेर सुमारे अडीच तास घालवले. त्यांनी पृथ्वीवर परत आणण्यासाठी चंद्राची सामग्री गोळा केली.

ट्रँक्विलिटी बेस नावाच्या साइटवर सुमारे २१ तास घालवले होते. त्यानंतर हे तिघे पृथ्वीवर परत आले आणि आठ दिवसांहून अधिक काळ अंतराळात राहिल्यानंतर २४ जुलै रोजी पॅसिफिक महासागरात उतरले.

हा दिवस नासाच्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक आहे. दि.२० जुलै रोजी अमेरिकन अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग आणि त्यांचा साथीदार बझ आल्ड्रिन यांनी चंद्रावर पाऊल ठेवले आणि सुमारे ४७.५ पौंड चंद्र सामग्री गोळा केली. जी त्यांनी अभ्यासासाठी पृथ्वीवर परत आणली. हा दिवस केवळ ऐतिहासिक मोहिमेचा उत्सव साजरा करत नाही तर शास्त्रज्ञांना आशा देतो की मानव आता अंतराळात जाऊ शकतो. नील आर्मस्ट्राँगच्या "वन स्मॉल स्टेप फॉर मॅन" या भाषणाने कल्पकतेला चालना दिली आणि नाविन्य निर्माण केले.

- ७१३२७९६६८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# भाजप सरकार आंदोलनाला घाबरून आंदोलकांवर बेकायदेशीर कारवाई करते : राहुल देशमुख

## काटोल येथे विद्यार्थ्यांच्या सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर समर्थनार्थ सर्व पक्षीय मोर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

बहुजन वंचित क्रांति सेना शेकाप व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटानी केंद्र सरकारच्या विरोधात तीव्र नारेबाजी करून परिसर दणाणून सोडला. देशात गोर गरिबांची मुले रात्रंदिवस कठीण अभ्यास करीत असतो आईवडीलसुद्धा आपली मुले शिकून चांगल्या नोकरीवर लागुन आपल्या परिवाराचा आधार झाला पाहिजे यासाठी कर्जबाजारी होऊन मुलांना शिक्षणासाठी मदत करतो मुलेही आशेने मेहनत करतात पण एन वेळेवर परीक्षेच्या अगोदरच्या दिवशी पेपर फुटतो त्यामुळे विद्यार्थी निराश होतात. आता आपले जीवन खराब झाले या निराशेने आत्महत्या करतात. या गंभीर गोष्टीकडे लक्ष सरकार देत नाही विद्यार्थ्यांच्या या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी सोनम वांगचुक व अभिजीत दिपके यांनी दिल्ली येथे आमरण उपोषण चालु केले आहे.



२० दिवस होऊनही सरकार चर्चा तर करत नाही पण बळजबरीने सोनम वांगचुक यांना डॉक्टरांच्या वेशात पोलिस पाठवून दडपशाहीने दवाखान्याच्या नावावर नजरकैदेत ठेवल्या गेले हा प्रकार देशाच्या लोकशाहीच्या व संविधानाच्या विरोधात आहे. सरकार आंदोलनाला घाबरते असे काटोलचे माजी नगराध्यक्ष राहुल देशमुख म्हणाले.

तर अभिजित दीपक यांनी चालु केलेल्या काकरोज पार्टीच्या वतीने विद्यार्थ्यांचे व तरुणांचे आंदोलनं चालू केले भाजप नेते व सरकार घाबरलेले आहे त्यामुळेच ते सोनम वांगचुक व अभिजीत दिपके यांच्यासह हजारो विद्यार्थ्यांवर पोलिसांच्या माध्यमातून लाठ्या चालवतात ही लोकशाहीची हत्या असून देश अराजकतेखाली जात आहे ही एक प्रकारे आणीबाणीच आहे. तेव्हा या विरोधात देश एक झाला पाहिजे व या तानाशाही सरकारला. हाकलून लावून संविधान वाचविले पाहिजे असे बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा परिषद तथा न.प काटोल चे माजी सभापती दिगांबर डोंगरे म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला दिगांबर डोंगरे यांनी माल्यार्पन केल्यानंतर आंदोलनं करण्यात आले. तानाशाही सरकार नहीं चलेगी भाजप सरकार हाय हाय, धर्मेंद्र प्रधान मुर्दाबाद, संविधान जिंदाबाद अशा जोरदार घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते एसडीओ कार्यालयापर्यंत शेकाप नेते तथा माजी नगराध्यक्ष राहुलबाबू देशमुख राहुल देशमुख बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष दिगांबर डोंगरे राष्ट्रवादी काँग्रेसचे श. प गटाचे नगरसेवक गणेश चन्ने यांच्या नेतृत्वात तर नगराध्यक्षा अर्चनाताई देशमुख, उपाध्यक्ष संदीप वंजारी, नगरसेविका प्रज्ञाताई डोंगरे, वकील संघाचे अध्यक्ष प्रवीण लव्हाळे, काँग्रेस पक्षाचे प्रताप ताटे, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष वैशाली तालातुले, शिवसेना उबाठा गटाचे मिलिंद देशमुख प्रहारचे दिनेश निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोर्चा काढून एस डी ओ मार्फत प्रधानमंत्र्याला निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनात ॲड. संजय देशमुख, ॲड. आनंद देशमुख, वंदना चौधरी, नगरसेविका प्रज्ञा डोंगरे, नगरसेवक सुरेंद्र लोही, महेंद्र गायकवाड, अमित काकडे, मिलिंद देशमुख, रवी खंते, अजय लाडसे, प्रा. विरेंद्र इंगळे प्रशांत पवार, स्वप्नील राऊत, निशिकांत नागमोते, भोजराज बागडे, राजु कोतेवार, दिपक मोहिते, बाबा शेळके, नरेंद्र राऊत, दिलीप घारड, उत्तमराव दुपारे, सुरेशराव देशभ्रतार, बाबाराव गोंडाने, बाबाराव तागडे, मिना पाटील, ललिता दुपारे, दिक्षा भालसागर, रंजना ढोके, निर्मला राक्षे, वंदना राजूरकर, आशा काळे, वर्षा निकोसे, प्रज्ञा बांगर, महेश येरपुडे यांच्यासह शेकाप बहुजन वंचित क्रांति सेनेचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रहारचे वकील संघाचे व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व प्रास्ताविक दिगांबर डोंगरे यांनी तर आभार मनोज सावरकर यांनी मानले.

---

## धनगौरी बाबा मंदिराच्या विकासासाठी नितीन गडकरींना निवेदन

### विश्वगुरू श्री संत रविदास मित्र परिवाराची ठोस मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पांढुर्णा जिल्ह्यातील मोरखा गावातील ऐतिहासिक धनगौरी बाबा (नागदेवता) मंदिराचा सर्वांगीण विकास करून भाविकांना अत्याधुनिक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच मंदिर



परिसरात श्री संत रविदास महाराज समाजभवन उभारण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी विश्वगुरू श्री संत रविदास मित्र परिवार तर्फे अध्यक्ष प्रेम (हितेश) मुंदाफळे यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय रस्ते वाहतूक तथा नागपूर लोकसभा खासदार नितीन गडकरी यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात मंदिर परिसरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, दर्जेदार रस्ते, भाविकांसाठी निवास व्यवस्था, पार्किंग, प्रकाश व्यवस्था, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच मंदिर परिसरात सुरू असलेल्या कथित अवैध दारू विक्रीवर कठोर कारवाई करून धार्मिक स्थळाचे पावित्र्य कायम राखण्याची मागणीही करण्यात आली.

यावेळी प्रेम मुंदाफळे यांनी सांगितले की, "दरवर्षी लाखो भाविक धनगौरी बाबा मंदिरात दर्शनासाठी येतात. एवढ्या मोठ्या धार्मिक स्थळाकडे दुर्लक्ष होणे दुर्दैवी आहे. शासनाने तातडीने निधी मंजूर करून मंदिराचा सर्वांगीण विकास करावा आणि भाविकांना सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात." अशी मागणी केली आहे. याप्रसंगी सुमीत पाचखंडे (सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया), नागेश गाजघाटे, ओम नवले, सचिन सिंगाळे, भूषण झलके, पवन इंगोले, प्रिया मुंदाफळे यांच्यासह विश्वगुरू श्री संत रविदास मित्र परिवाराचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## महिला मंडळाचा मध्यरात्री धाडसी एल्गार; ३५ पिपे गावठी दारूचे रसायन नष्ट

### अंबाडा परिसरातील अवैध दारू व्यवसायाला मोठा दणका; कारवाईने दारू माफियांचे धाबे दणाणले

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

दारूबंदी असलेल्या अंबाडा गावात सुरू असलेल्या अवैध गावठी दारू व्यवसायाविरोधात अखेर महिला मंडळाने आक्रमक पवित्रा घेत मध्यरात्री खलानगोंदी शिवारात धाड टाकत तब्बल ३५ पिप्यांतील गावठी दारूचे रसायन नष्ट केले. या धाडसी कारवाईमुळे अंबाडा परिसरातील अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले असून संपूर्ण परिसरात या कारवाईची जोरदार चर्चा सुरू आहे.



अंजली लीलाधर भड यांच्या नेतृत्वाखाली अंबाडा महिला मंडळाच्या सदस्यांनी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे खलानगोंदी शिवारात धाड टाकली. तेथे मोठ्या प्रमाणात गावठी दारू निर्मितीसाठी साठवून ठेवलेले रसायन आढळून आले. याची माहिती तातडीने जलालखेडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पवन बांबुळकर यांना देण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी निलेश खरडे घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून सुमारे ३५ पिप्यांतील गावठी दारूचे रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले.

विशेष म्हणजे, अंबाडा गाव दारूबंदी गाव म्हणून ओळखले जात असले तरी काही समाजकंटकांकडून लपूनछपून गावठी दारूची निर्मिती व विक्री सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या. या अवैध धंद्यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असून महिलांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर महिलांनीच पुढाकार घेत थेट धाड टाकल्याने अवैध दारू व्यवसायिकांना मोठा धक्का बसला आहे.

लीलाधर भड हे काटोल विधानसभा मतदारसंघाचे आमदार चरणसिंग ठाकूर यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. सामाजिक प्रश्नांवर त्यांनी सातत्याने भूमिका घेतली असून, या कारवाईतही त्यांनी महिला मंडळाला सक्रिय सहकार्य केल्याची चर्चा परिसरात आहे.

या कारवाईनंतर अंबाडा, खलानगोंदी व परिसरातील अवैध दारू अड्ड्यांवर धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी या कारवाईचे स्वागत करत अवैध दारू व्यवसाय पूर्णपणे बंद करण्यासाठी पोलिसांनी नियमित धाडी सुरू ठेवाव्यात, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, अवैध दारू निर्मितीमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर गुन्हे दाखल करावेत, तसेच अशा ठिकाणांवर सातत्याने कारवाई करून दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी अंबाडा परिसरातील नागरिक व महिला मंडळाने केली आहे.

---

## रोटरी क्लब बल्लारपूरचा १५ वा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न : समाजोपयोगी उपक्रमांचा निर्धार

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

रोटरी क्लब बल्लारपूरच्या वर्ष २०२६-२०२७ या कार्यकाळासाठीचा १५ वा पदग्रहण सोहळा शनिवारी १८ जुलै रोजी विद्याश्री कॉन्व्हेंट, बल्लारपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नवनियुक्त अध्यक्ष म्हणून रोटेरियन राजू मुंधडा, तर सचिव म्हणून रोटेरियन निखिल गुजरकर यांनी पदभार स्वीकारत आगामी काळात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटेरियन राजू मुंधडा होते. प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी तथा रोटेरियन अर्जुन पावरा, उपप्रांतपाल अनुप यादव, वन्यजीव संवर्धन तज्ज्ञ दिनेश खाटे, मावळते अध्यक्ष निलेश चिमड्यालवार तसेच नवनियुक्त सचिव निखिल गुजरकर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर पुष्पगुच्छ देऊन उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.

मावळते अध्यक्ष निलेश चिमड्यालवार यांनी आपल्या कार्यकाळात राबविण्यात आलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांचा आढावा घेतला. त्यानंतर नूतन अध्यक्ष राजू मुंधडा यांनी मावळते अध्यक्ष निलेश चिमड्यालवार यांच्याकडून पदभार स्वीकारला. तसेच नूतन सचिव निखिल गुजरकर यांनी मावळते



सचिव राजू मुंधडा यांच्याकडून कार्यभार स्वीकारला.

यावेळी रोटरॅक्ट क्लब बल्लारपूरच्याही नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा पार पडला. नूतन अध्यक्ष देव मेश्राम आणि नूतन सचिव अमोल वर्मा यांनी पदभार स्वीकारून नवीन कार्यकाळाची जबाबदारी स्वीकारली.

समाजसेवेच्या परंपरेला पुढे नेत रोटरी क्लब बल्लारपूरतर्फे यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळा आणि साईबाबा प्राथमिक शाळा (नगर परिषद, बल्लारपूर) यांना वॉटर प्युरिफायर मशीनचे वितरण करण्यात आले. तसेच अमित कुमार यांचे नवीन सदस्य म्हणून रोटरी पिन प्रदान करून स्वागत करण्यात आले.

उपप्रांतपाल अनुप यादव यांनी रोटरी क्लब बल्लारपूरच्या समाजोपयोगी कार्याचे कौतुक करत भविष्यातही सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. वन्यजीव संवर्धन तज्ज्ञ दिनेश खाटे यांनी वन्यजीव संरक्षणामध्ये सामाजिक संस्थांची भूमिका स्पष्ट केली. प्रमुख अतिथी अर्जुन पावरा यांनीही रोटरीच्या कार्याचे कौतुक करून प्रशासनाच्या वतीने आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी वर्ष २०२६-२०२७ साठी बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवड करण्यात आली. अध्यक्षीय भाषणात राजू मुंधडा यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक बांधिलकी जपत विविध लोकहिताचे उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

या सोहळ्यास रोटेरियन मनीष मूलचंदानी, कल्पेश पटेल, प्रफुल चरपे, उमेश पटेल, राहुल वरू, अनुप गंगशेट्टीवार, विक्रांत पंडित, हेमराज गेडाम, शैलेश झाडे, अजय वासलवार, गोपाल ठाकूर, रमेश पटेल, अखिल निखारे, सचिन तल्हार, अमित कुमार, उत्तम पटेल, सुरेश कुकरेजा, डॉ. प्रशिक वाघमारे यांच्यासह रोटरॅक्ट क्लबचे सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोटेरियन प्रशांत दोंतुलवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन रोटरॅक्टर अमोल वर्मा यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

---

**थोडक्यात**

## सिंगोरी येथे गळफास लावून युवकाची आत्महत्या

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी पोलीस स्टेशन हद्दीतील सिंगोरी(साहोली) येथील युवक राहूल सुर्यभान रांगणकर वय ३३ वर्षे याने सोमवारी २०



जुलै रोजी दुपारी ११.३० वाजता दरम्यान राहते घरीच गळफास घेवून आत्महत्या केली. मिळालेल्या माहितीनुसार हकिकत अशी आहे की, घरी राहूल व त्याची आई दोघेच राहत होते. घटनेच्या वेळी त्याची मजुरीने शेतीकाम करायला गेली होती.तेव्हा तेव्हा राहूलचे मित्र त्याला भेटण्यासाठी घरी गेला असता. तो घराच्या लाकडी फाट्याला नायलन दोरीने गळफास लावल्याचे दिसून आले. तेव्हा हि माहिती लगेच त्याच्या आईला देवून त्याला उपचारासाठी खाजगी हॉस्पिटल खापरखेडा येथे दाखल केले असता वैद्यकीय तपाणीत मृत घोषित केले.

घटनेची माहिती पारशिवनी पोलीसात देण्यात आली. माहिती मिळताच पोलीस दल घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून शवविच्छेदन करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय पारशिवनी येथे दाखल केले. शवविच्छेदन करुन शव नातेवाईकांना सोपविण्यात आले.आत्महत्याचे कारण कळू शकले नाही.पारशिवनी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. पुढील तपास पारशिवनी पोलीस करीत आहे.

## सिटूतर्फे आशा वर्कर्सचे मुक आंदोलन, धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स संलग्न आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन, नागपूर जिल्ह्याच्या वतीने रविवारी संविधान चौक येथे मुक आंदोलन करण्यात आले. आंदोलना दरम्यान आशा वर्कर्सनी तोंडावर मास्क लावून, हातात तिरंगा ध्वज घेऊन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. कॉ. राजेंद्र साठे, कॉ. प्रीती मेश्राम आणि कॉ. रंजना पौनीकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. आंदोलनात मोठ्या संख्येने आशा वर्कर्स सहभागी झाल्या. आंदोलनाची शांततापूर्ण व वेगळी पद्धत पाहून उपस्थित नागरिक आणि माध्यमांचे लक्ष वेधले गेले. यावेळी बोलतांना कॉ. राजेंद्र साठे यांनी नीट प्रश्नपत्रिका गैरव्यवहार प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी दिल्लीतील आंदोलनांबाबतही त्यांनी आपली भूमिका मांडत,आंदोलकांवरील कारवाईचा निषेध व्यक्त केला आणि लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनांना दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. आंदोलनात कॉ. विठ्ठल जुनघरे, कॉ. प्रमोद कावळे, कॉ. उज्वला कांबळे, संजय अंभोरे, नालंदा गणवीर यांच्यासह अनेक पदाधिकारी व आशा वर्कर्स उपस्थित होत्या.

## हिंगणघाट शहरात २६ जुलै रोजी, भव्य वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, हिंगणघाट**

सहयोग कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था, नागपूरद्वारे संचालित बुद्धिस्ट मंगल परिणय ग्रुप, नागपूर यांच्या वतीने हिंगणघाट शहरात राज्यस्तरीय भव्य-दिव्य वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा रविवार, दि. २६ जुलै रोजी, दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत न्यू यशवंत नगर, मास्टर कॉलनी येथील रिठे भवन, हिंगणघाट येथे संपन्न होणार आहे. समाजातील विवाहयोग्य युवक- युवतींना योग्य जीवनसाथी शोधण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे वधू-वर व त्यांच्या पालकांना एकाच ठिकाणी परिचय करून घेण्याची संधी उपलब्ध होणार असून, समाजात सुसंवाद व सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होण्यास मदत होईल. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक विक्रांत भगत, सामाजिक कार्यकर्ते ईश्वरदास कुंभारे, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत मून, पत्रकार दिनेश घरडे तसेच संयोजक नरेश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या उपक्रमाचे आयोजन प्रमोद सोमकुंवर व उमाकांत सोमकुवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, विवाह इच्छुक युवक- युवती, त्यांचे पालक व समाज बांधवांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## कोदामेंढी व तारसा रेल्वे (निमखेडा) परिसरात धुवाधार पावसाच्या आगमन होताच, शेतातील कामे अर्ध्यातच सोडून मजुवर्गाचे घरी पलायन



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

आज सोमवार (ता. २० जुलै)ला दुपारी सव्वातीन ते सव्वाचार दरम्यान एक तास कोदामेंढी, तारसा रेल्वे (निमखेडा) परिसरासह मौदा तालुक्यात यंदाच्या प्रथमच धुवाधार पाऊस झाला. या धुवाधार पावसामुळे शेतात काम करणारे महिला मजूरवर्ग मिरचीचे रोपे लावण्याचे कामे अर्ध्यातच सोडून, शेतात पाणी साचल्याने वेळेपूर्वीच घरी येताना दिसले. शाळेच्या सुट्टीपर्यंत पाऊस सुरूच असल्याने विद्यार्थीही ओले होत घरी जाताना दिसले. या पावसामुळे धान रोवणीच्या कामाला वेग येणार असून शेतकरी व मजूर वर्गात आनंदाचे वातावरण दिसले.

थोडक्यात

## इनर व्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीचा पदग्रहण समारंभ सिताबर्डी येथील फॉरच्युन मॉलमध्ये उत्साहपूर्ण पार पडला. यावेळी क्लबच्या नूतन अध्यक्षा स्मिता बागडदेव यांनी तर मोनिका वारोतकर यांनी सचिव म्हणून पदभार स्वीकारला. नव्या कार्यकारिणीने आगामी वर्षात समाजोपयोगी व सेवाभावी उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. समारंभा दरम्यान क्लबतर्फे तीन महत्त्वपूर्ण सेवा प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले. 'इनर व्हील ब्रँडिंग प्रोजेक्ट' अंतर्गत इनर व्हीलचे नाव व लोगो असलेल्या ६० छत्र्या सदस्यांनी खरेदी करून त्या गरजू नागरिकांना वितरित करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. तसेच मावळत्या अध्यक्षा डॉ. शारदा रोशनखेडे यांच्या हस्ते दहावीतील पाच गरजू विद्यार्थ्यांना संपूर्ण शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

याशिवाय, आई- वडिलांचे छत्र हरपलेल्या दहावीतील विद्यार्थिनी अनन्या उपासे हिच्या शिक्षणासाठी रिता रावका व वैशाली चिंचोळकर यांनी आर्थिक मदत प्रदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इनर व्हील डिस्ट्रिक्ट ३०३ च्या डिस्ट्रिक्ट चेअर मन मनीषा चौधरी उपस्थित होत्या. त्यांनी सेवाभाव, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक उत्तरदायित्व या विषयांवर मार्गदर्शन करत समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध कलाकार प्रियंका ठाकूर उपस्थित होत्या. यावेळी क्लबच्या संपादक सीमा मेटांगळे यांनी नव्या वर्षातील क्लबचे पहिले बुलेटीन "स्वामिनी" प्रकाशित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पद्मा देठे व वर्षा पानबुडे यांनी केले. समारंभाला क्लबच्या सदस्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. नव्या कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली आगामी वर्षात शिक्षण, महिला सक्षमीकरण, सामाजिक सेवा आणि गरजूंच्या मदतीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## आसमान फाउंडेशन तर्फे भोरगड (काटोल) येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आसमान फाउंडेशन, नागपूरच्यावतीने काटोल तालुक्यातील भोरगड येथील इंग्रजी माध्यम शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक सत्रानिमित्त शालेय साहित्य, ड्रॉइंग बुक व कलर बॉक्सचे वाटप करण्यात आले. यासोबतच आश्रम शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. यावेळी आसमान फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवी गिऱ्हे यांनी भोरगडसारख्या दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या आश्रमशाळा प्रशासनाचे कौतुक करत त्यांचे आभार मानले.

फाउंडेशनतर्फे दरवर्षी प्रमाणे या भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून सहकार्य करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला आसमान फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवी गिऱ्हे, सचिव नरेश शेंडे, संचालक दिनेश टेकाडे, आसमान महिला क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षा व फाउंडेशनच्या संचालिका मेघा गिऱ्हे, आश्रमशाळेचे अधीक्षक सुदर्शन पोटोडे, शिक्षकवृंद तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त 'देवाभाऊ कृषी माऊली सोहळा' २२ जुलैला

### १०० महिला शेतकऱ्यांना मोफत 'कृषी माऊली' किट, थेट माती परीक्षणाचे प्रात्यक्षिकही

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने बुधवार, २२ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजता वंदे मातरम् उद्यान, बजेरिया (रजवाडा पॅलेससमोर), येथे 'देवाभाऊ कृषी माऊली सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. महिला शेतकऱ्यांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात १०० महिला शेतकऱ्यांना मोफत 'कृषी माऊली' किट वितरित करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला शेतकऱ्यांच्या हक्क आणि सक्षमीकरणासाठी घेतलेल्या निर्णयांना अभिवादन म्हणून हा अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्रदादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्राताई वाघ यांच्या संकल्पनेतून साकारत आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे थेट माती परीक्षण (लाईव्ह सॉईल टेस्टिंग) प्रात्यक्षिक. कृषी विज्ञान केंद्र, तालुका कृषी अधिकारी तसेच कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ महिला शेतकऱ्यांना मातीचा नमुना कसा घ्यावा, मातीची सुपीकता कशी तपासावी आणि उत्पादनवाढीसाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी वितरित करण्यात येणाऱ्या 'कृषी माऊली' किटमध्ये पर्यावरणपूरक कापडी पिशवी, प्रगत भाजीपाला बियाणे, जैविक खते, शेतीसाठी उपयुक्त अवजारे (खुरपे, विळा आदी), रात्रीच्या सुरक्षिततेसाठी टॉर्च यांचा समावेश आहे. किटवरील पिशवीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे छायाचित्र आणि 'भाजप महिला मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश' असा उल्लेख करण्यात आला आहे. महिला शेतकरी भगिनींच्या शेती क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत त्यांना अधिक सक्षम, आत्मनिर्भर आणि आधुनिक शेतीकडे प्रेरित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती भाजप महिला मोर्चाच्या वतीने देण्यात आली आहे.

# वर्ध्यात सहकार संकुलासाठी १ हेक्टर शासकीय जमीन मंजूर

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्याला यश



> सहकार चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी आणि नागरिकांना सहकार विभागाच्या सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी वर्ध्यात आधुनिक सहकार संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
> **- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वर्धा जिल्ह्यातील मौजा पिंपरी (मेघे) येथील सुमारे १ हेक्टर शासकीय जमीन सहकार संकुल इमारतीच्या उभारणीसाठी उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली. महसूल मंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्वाचा निर्णय घेतला आहे. महसूल व वन विभागाने याबाबत शासन ज्ञापन जारी केले असून, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांच्या नावे ही जमीन विविध अटी व शर्तीसह उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे वर्धा जिल्ह्यात सहकार विभागाच्या प्रशासकीय सुविधा अधिक सक्षम होणार असून, एकाच ठिकाणी विविध सहकारी संस्थांशी संबंधित कामकाजासाठी आधुनिक सहकार संकुल उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे नागरिक, शेतकरी आणि सहकारी संस्थांना अधिक कार्यक्षम सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल. शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार मंजूर उद्देशाव्यतिरिक्त जमिनीचा वापर करता येणार नाही. तसेच नियमानुसार आवश्यक परवानग्या घेऊन निश्चित कालावधीत बांधकाम पूर्ण करणे बंधनकारक राहणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन सहकार क्षेत्राच्या पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी कटिबद्ध असून, या प्रकल्पामुळे प्रशासन अधिक कार्यक्षम, गतिमान आणि नागरिकाभिमुख होईल. शासनाने घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन झाल्यास संबंधित जमीन पुन्हा शासनजमा करण्याचा अधिकार शासनाकडे राखीव असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी उमरेडमध्ये दोन विद्यार्थ्यांच्या आमरण उपोषणाचा तिसरा दिवस, राष्ट्रपतींसह केंद्र व राज्य शासनाला निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
**मनिष शिंगणे**




विद्यार्थ्यांच्या परीक्षा हक्कांचे संरक्षण, परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता व उत्तरदायित्व आणि देशातील शिक्षण व्यवस्थेत मूलभूत सुधारणा करण्याच्या मागण्यांसाठी उमरेड येथील विद्यार्थी अर्शव शिंगणे (वय १८ वर्षे) व कौशिक भेंडे (वय १९ वर्षे) यांचे शांततापूर्ण आमरण उपोषण आज तिसऱ्या दिवशीही सुरू आहे. यावेळी पृथ्वी झाडे, देवांश कुकुडकर, तुषार शिंगणे, निलय गुजरकर, रजत गायगावली, तक्ष नागदेवते, ओम कुहीकर, सौम्या देवगडे, श्रावण संत, प्रतीक्षा गेडाम, कोहिनूर माटे सहकारी उपोषणास होते. उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांनी भारताच्या राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय शिक्षण मंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधित सक्षम प्राधिकरणांना सविस्तर निवेदन पाठवून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात देशातील परीक्षा व्यवस्थेतील पेपरफुटी, परीक्षा रद्द होणे, निकालातील विलंब व इतर गंभीर अनियमितता यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, मानसिक व आर्थिक नुकसान होत असल्याची गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, निष्पक्षता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली आहे.

उपोषणकर्त्यांनी शासनाकडे प्रमुख मागण्या मांडल्या असून, परीक्षा-संबंधित संकटांमुळे प्रभावित विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना न्याय्य आर्थिक व संस्थात्मक मदत देण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करणे, मागील पाच वर्षांतील परीक्षा पेपरफुटी व मोठ्या परीक्षा अनियमिततेची स्वतंत्र राष्ट्रीय स्तरावर चौकशी करणे, दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करणे तसेच २१ व्या शतकाच्या गरजांनुसार आधुनिक, वैज्ञानिक, विद्यार्थी-केंद्रित आणि कौशल्याधारित शिक्षण व्यवस्था विकसित करण्याची मागणी केली आहे.

विद्यार्थ्यांनी परीक्षा व्यवस्थेबाबत निर्माण झालेल्या गंभीर चिंता व अविश्वासाच्या पार्श्वभूमीवर संबंधित राजकीय व प्रशासकीय उत्तरदायित्व निश्चित करण्याची मागणी केली असून, केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणीही आपल्या निवेदनात नोंदवली आहे. तसेच हे संपूर्ण निवेदन सक्षम केंद्र शासन प्राधिकरणाकडे तातडीने अग्रेषित करण्याची विनंती करण्यात आली आहे.

उपोषणकर्त्यांनी पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षण व्यवस्थेशी संबंधित उपस्थित केलेल्या मागण्यांना पाठिंबा जाहीर केला असून, त्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय होईपर्यंत आपले शांततापूर्ण आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

प्रशासनाकडे करण्यात आलेल्या विनंतीत निवेदनाची अधिकृत दखल घेणे, लेखी प्राप्ती देणे, मागण्या राज्य व केंद्र शासनाकडे तातडीने पाठविणे, संबंधित सक्षम प्राधिकरणांकडून कार्यवाही अहवाल मागविणे तसेच उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याची आवश्यक वैद्यकीय काळजी घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले की, त्यांचे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण, अहिंसक आणि संविधानिक मार्गाने सुरू असून त्यांचा उद्देश संघर्ष नव्हे, तर संवाद, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी न्याय्य सुधारणा घडवून आणणे हा आहे. "आम्हाला सहानुभूती नको, आम्हाला न्याय हवा आहे. आम्हाला उत्तरदायित्व हवे आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अर्थपूर्ण सुधारणा हव्या आहेत," असा ठाम संदेश उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांनी आपल्या निवेदनातून दिला आहे. सोनम वांगचुक यांच्या सूचनेवरून उपोषणाची सांगता करण्यासाठी शासनाच्या वतीने तहसीलदार प्रेमकुमार आडे व सामाजिक कार्यकर्त्या झेबुनिसा शेख ताई यांच्या हस्ते उपोषण सोडण्यात आले.

## पेपरफुटी प्रकरणावरून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, खापरखेडा शाखेतर्फे राष्ट्रपतींना निवेदन




**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

देशातील विविध राष्ट्रीय प्रवेश व पात्रता परीक्षांमध्ये कथित पेपरफुटी, गैरव्यवहार आणि अनियमिततेच्या घटनांमुळे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) खापरखेडा शाखेच्यावतीने करण्यात आली. यासंदर्भात सोमवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना जिल्हाधिकारी, नागपूर तसेच खापरखेडा पोलीस ठाण्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात NEET-UG, NEET-PG, UGC-NET आणि CUET यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये कथित पेपरफुटी व गैरव्यवहाराच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.वर्षभर परिश्रम घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा रद्द होणे, पुनर्परीक्षा, निकालातील गोंधळ अशा समस्यांना सामोरे जावे लागत असून त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये शिक्षण व्यवस्थेबाबत अविश्वासाचे वातावरण निर्माण झाल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी व्हावी तसेच संपूर्ण शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समितीची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी आरपीआयच्या वतीने करण्यात आली आहे. देशातील कोट्यवधी विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून केंद्र सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली. निवेदन देतांना आरपीआय खापरखेडा शाखेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोन्या संख्येने उपस्थित होते.

## 'गजर विठ्ठल नामाचा' भक्तिमय गीतांचा कार्यक्रम २४ जुलै रोजी

### आषाढी एकादशीनिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाचे विशेष आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठलाच्या भक्तीरंगात चिंब करणारा 'गजर विठ्ठल नामाचा' हा भक्तिमय गीतांचा कार्यक्रम शुक्रवार, २४ जुलै रोजी संध्याकाळी ६ वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशीष शेलार यांच्या मार्गदर्शनात होत असून आ. प्रवीण दटके यांची संकल्पना आहे. या कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय पुरस्कार विजेती पार्श्वगायिका सावनी रवींद्र, सारेगमप फेम अभिषेक मारोटकर, इंडियन आयडल फेम ऋषिकेश करमरकर, व मंजिरी वैद्य अय्यर हे गायक कलाकार विविध भक्तिगीते सादर करतील. कार्यक्रमाचे निवेदक किशोर गलांडे असून संगीत संयोजक परिमल जोशी आहेत.

या निःशुल्क कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालय संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

## सुगंधित तंबाखूच्या अवैध वाहतुकीकडे नरखेड पोलिसांचे दुर्लक्ष ?

### पांढुर्णा-बेलोना मार्ग 'हॉटस्पॉट', अल्पवयीन मुलांचा वापर होत असल्याचा आरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

मध्य प्रदेशातील पांढुर्णा येथून मोठ्या प्रमाणात सुगंधित तंबाखूची अवैध वाहतूक नागपूर व अमरावती जिल्ह्यात होत असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. ही वाहतूक प्रामुख्याने पांढुर्णा-बेलोना-मोवाड मार्गे रात्री व पहाटेच्या सुमारास मोटारसायकलींच्या माध्यमातून केली जात असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण मार्ग नरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जात असतानाही या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मोवाड येथे पोलीस चौकी असतानाही दररोज होणाऱ्या संशयास्पद हालचालींकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दररोज मोठ्या प्रमाणात सुगंधित तंबाखूची वाहतूक होत असूनही संबंधित यंत्रणेकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने अवैध व्यवसायिकांचे मनोबल वाढल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

धक्कादायक बाब म्हणजे या अवैध वाहतुकीसाठी काही अल्पवयीन मुलांना व बेरोजगार युवकांना पैशांचे आमिष दाखवून वापरले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. काही हजार रुपयांच्या मोबदल्यात त्यांच्याकडून मोटारसायकलवर तंबाखूची पोती वाहून नेली जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे युवकांचे भविष्य धोक्यात येत असून त्यांना नकळत गुन्हेगारीच्या विळख्यात ओढले जात असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

सुमारे आठ दिवसांपूर्वी मदना-जलालखेडा मार्गावर एका होमगार्डने संशयावरून एका युवकाला अडवून त्याच्याकडील गोणीची तपासणी केली असता त्यामध्ये सुगंधित तंबाखू आढळून आल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर एका पोलीस कर्मचाऱ्याने संबंधित होमगार्डशी संपर्क साधून युवकाला सोडून देण्यास सांगितल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून, याबाबत पोलीस विभागाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

दरम्यान, पांढुर्णा-बेलोना मार्ग हा अवैध तंबाखू वाहतुकीसाठी सुरक्षित मार्ग बनत असल्याची चर्चा असून, या मार्गावर नियमित नाकाबंदी, सीसीटीव्ही तपासणी आणि संयुक्त तपास मोहीम राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच या रॅकेटमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

आरोग्यास अपायकारक असलेल्या सुगंधित तंबाखूचा वापर वाढत असताना त्याची अवैध वाहतूक रोखणे ही कायदा अंमलबजावणी यंत्रणेसमोरील मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच अल्पवयीन मुलांचा वापर करणाऱ्या टोळ्यांवर संघटित गुन्हेगारीच्या अनुषंगाने कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

